महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ सभागृह,सहयाद्री अतिथीगृह येथे सोमवार, दि११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या ५० व्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (आदिवासी विकास), मा.मंत्री (महसूल), मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास), विशेष निमंत्रित सदस्य, जनजाती सल्लागार परिषदेवरील विधानसभा सदस्य, मा. मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव आणि इतर अन्य उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस प्रधान सचिव (आदिवासी विकास) यांनी मा. मुख्यमंत्री , मा.संसद सदस्य, सर्व विधानसभा सदस्य, सर्व निमंत्रित सदस्य यांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक सुरुवात केली.

प्रथमत: विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण योजनांचा आढावा घेण्यात आला, तद्‌नंतर जनजाती सल्लागार परिषदेच्या ४९ व्या बैठकीतील इतिवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थितीची माहिती दिली. त्याला बैठकीत मान्यता देण्यात आली व त्यानंतर ५० व्या बैठकीतील विषयावर प्रधान सचिव (आ.वि.) यांनी सादरीकरण केले सादरीकरणामध्ये मा. राज्यपाल महोदय यांनी सुचविलेले विषय, मा. सदस्य जनजाती सल्लागार परिषद यांनी सुचविलेले विषय व विभागामार्फत समावेश केलेले विषय यांचा एकत्रित विचार करण्यात आला. प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| विषय क्र. | मुद्दा | संबंधित विभाग | मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले निर्देश |
|---|---|---|---|
| १ | विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील नाविन्यपूर्ण योजनांचा आढावा घेण्यात यावा. मिशन शौर्य,जीवनकौशल्य प्रशिक्षण, कायापालट अभियान,अटल आरोग्य वाहिनी व शालेय आरोग्य व्यवस्थापन सेंटर, विज्ञान शिक्षण व प्रशिक्षण उपक्रम (एकलव्य फाउंडेशन), इंग्रजी शिक्षण उपक्रम (कराडी पथ), क्वेस्ट सेंटर मुंबई येथे स्थापना, पुणे विद्यापीठ येथे डाटा ॲनालिटिक्स व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सेंटर, तज्ञ संस्थेमार्फत शेतकरी उत्पादक संस्था (FPO) स्थापन करणे, स्त्री शक्ती या संस्थेमार्फत | आदिवासी विकास | विभागामार्फत राबविण्यात आलेल्या सर्व नाविण्यपूर्ण योजनांची परिषदेने नोंद घेतली. तसेच त्यास मान्यता दिली. |

<table>
<tr><td></td><td>नवीन मध्यवर्ती स्वयंपाक गृहाची अंमलबजावणी, विभागाकरीता माध्यम व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे, वनहक्क लाभार्थ्यासाठी कृषी संलग्न योजना राबविणे व महाट्राईब नावाने ब्रँड विकासित करणे.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>जनजाती सल्लागार समितीच्या ४९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा</td><td>आदिवासी विकास</td><td>जनजाती सल्लागार समितीच्या ४९ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची जनजाती सल्लागार समितीने नोंद घेतली.</td></tr>
<tr><td>३</td><td>जनजाती सल्लागार परिषदेमध्ये वनहक्क कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत चर्चा करावी. वैयक्तीक वनहक्क आणि सामूहिक वनहक्क यांची गावपातळीवरील अंमलबजावणी.</td><td>महसूल व वन</td><td rowspan="3">(१) वनहक्क कायदा २००६ अंतर्गत पात्र वनहक्क धारकांना नियमानुसार १ एकरपेक्षा कमी क्षेत्र देण्यात येऊ नये. नियमानुसार वनपट्टे मंजूर न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.<br>(२) जिल्हास्तरीय वनहक्क समितीच्या लगतच्या दोन बैठकीस जे जिल्हा वनसंरक्षक (DFO) उपस्थित राहणार नाहीत, त्यांच्यावर वन विभागाने कारवाई करावी.<br>धुळे व नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यामार्फत जिल्हा वनसरंक्षक हे जिल्हास्तरीय वनहक्क समितीच्या बैठकीस अनुपस्थित का राहिले याबाबतचा खुलासा मागवावा.<br>(३) वनहक्क कायदा २००६ अंतर्गत ज्या वनहक्कधारकांना वनपट्टे मंजूर झालेले आहेत, अशा वनहक्कधारकांना १ महिन्याच्या आत ७/१२ उतारे देण्यात यावेत, हे काम महसूल विभागाने ४ दिवसात सुरु करावे. तसेच जमीन मोजणीची कामे तात्काळ मोहिम स्वरुपात पुर्ण करावीत. यासंदर्भामध्ये महसूल व वन विभागाने सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित कराव्यात.<br>(४) सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत ज्या वन विभागाच्या जमिनीस महसूली दर्जा देण्यात आला आहे, अशा प्रकरणी महसूल व वन विभागाने मार्गदर्शक सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात. तसेच सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण ज्या जागेवर केले आहे तेथील मूळ पट्टे धारक व पुर्नवसित लोक यांच्यामध्ये पट्टयाबाबत अडचण निर्माण झाल्याने त्याच्यावर उपाय करणे.</td></tr>
<tr><td>४</td><td>वनहक्क कायदा २००५ अंतर्गत आदिवासी व इतर वनपट्टे वनपट्टेधारकांना ७/१२ उतारा तात्काळ देण्यात यावा. ज्या महसूली गावात एकापेक्षा जास्त पाडे/वस्त्या आहेत, तेथे सर्व पाडयांचा एकत्रित विचार करुन सामुहिक दावे मंजुर करावे असे संबंधित वनहक्क समिती व जिल्हाधिकारी यांना शासनातर्फे निर्देश देण्यात यावेत.</td><td>महसूल व वन</td></tr>
<tr><td>५</td><td>वन हक्क कायद्याची अंमलबजावणी त्वरीत करणे. जमीन दावेदाराच्या कब्जा वहिवाटीत असलेली जमीन त्यास ७/१२ ला मोजून दिली पाहिजे.</td><td>महसूल व वन</td></tr>
<tr><td>६</td><td>राज्यातील वनहक्क् अधिनियम अंतर्गत सामुहिक व वैयक्तिक दावे लक्षात घेता वनपट्टे देण्यात येतात.</td><td>महसूल व वन</td><td>राज्यातील वनहक्क अधिनियमांतर्गत सामुहिक व वैयक्तिक दावे विचारात घेऊन वन पट्टे देण्यात येतात. त्याच धर्तीवर गायरान सोडून</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | त्याच धर्तीवर पिढयानपिढया महसूल जमिनीवर अतिक्रमण करुन उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना महसूल जमिनीचे पट्टे देण्यात यावेत. | | इतर महसूली जमिनीवर अतिक्रमण करून उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना महसूल जमिनीचे पट्टे देण्याबाबत महसूल विभागाने पडताळणी करावी. तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागाने योजना राबवावी. |
| ७ | वैयक्तिक वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांमध्ये प्रधान्य व कर्ज माफी, प्रधानमंत्री किसान सन्मान व तत्सम योजनांमध्ये समावेश करणे | आदिवासी विकास | वैयक्तिक वनहक्क धारकांना प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत रु. ६०००/- इतकी रक्कम प्रधानमंत्री किसान योजना मधून देण्यात यावी. |
| ८ | जनजाती सल्लागार परिषदेमध्ये पेसा अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ५% निधीच्या वापराबाबत चर्चा करण्यात यावी. जनजाती सल्लागार परिषदेने ग्रामपंचायतीमधील निधी त्यातील ग्रामसभा कोषमध्ये वितरीत करण्याबाबतची शक्यता पडताळावी. पेसा अंतर्गत वितरीत करण्यात येणारा निधी ५% वरुन १०% करण्यांत यावा. | आदिवासी विकास व ग्रामविकास | पेसा अंतर्गत वितरीत करण्यात येणारी रक्कम ५ टक्के वरून १० टक्के करण्यासंदर्भात आदिवासी विकास विभागाने वित्त विभागाशी विचारविनिमय करून निधीच्या उपलब्धतेनुसार निर्णय घ्यावा. |
| ९ | राज्य शासनाने सर्व संबंधित कायदे पेसा कायदयाशी सुसंगत करणे व क्षेत्रिय स्तरावर पेसा कायदयाचे अमंजबजावणी करणे. | ग्रामविकास | सचिव (ग्राम विकास) यांनी राज्य शासनाचे ए.पी.एम.सी. वगळता सर्व कायदे पेसा कायद्याशी सुसंगत झाले आहेत याबाबतची माहिती परिषदेस दिली. याची परिषदेने नोंद घेतली. तसेच, ए.पी.एम.सी. कायदा पेसा कायद्याशी सुसंगत करण्याबाबत व क्षेत्रिय स्तरावर पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले |
| १० | पेसा कायदयातील तरतूदीत प्रत्यक्षात आणण्याकरीता राज्य घटनेच्या ११ व्या अनुसूचित नुसार पंचायत राज संस्थेकडे विषय हस्तांरीत करण्याबाबत जनजाती सल्लागार परिषदेने आढावा घ्यावा. | ग्रामविकास | बैठकीदरम्यान सचिव (ग्राम विकास) यांनी ७३व्या दुरुस्तीनुसार एकूण २९ विषयांपैकी १४ विषय पंचायत राज संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात आले असून, १५ विषय हस्तांतरीत करण्याची कार्यवाही शिल्लक असल्याची माहिती परिषदेस दिली. यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश परिषदेने दिले. |
| ११ | पेसा ५ टक्के अबंध निधी योजनेची ग्रामविकास विभागामार्फत अंमलबजावणी व संनियंत्रण करणे | आदिवासी विकास व ग्रामविकास | याबाबत ग्रामविकास विभागाने अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याबाबत सहमती दर्शविली. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित क्षेत्राची पुनर्रचना करुन केंद्र शासनास प्रस्ताव पाठविणे. | आदिवासी विकास | २०११ च्या जनगणनेनुसार अनुसुचित क्षेत्राची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास दि.३०.०४.२०१९ पर्यंत पाठविण्यात यावा, असे परिषदेने निर्देश दिले. प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यापूर्वी सांख्यिकीय माहितीची खातरजमा करण्यात यावी. |
| १३ | आदिवासी विकासासाठी पुरेशी अर्थसंकल्पिय तरतुद खात्रीने उपलब्ध करुन देण्यासाठी कायदा तयार करणेबाबत. | आदिवासी विकास व वित्त विभाग | निती आयोगाच्या स्थापनेनंतर खर्चाच्या वर्गीकरणामध्ये झालेल्या बदलास अनुसरुन आंध्रप्रदेश राज्याने याविषयी कशा प्रकारे कायद्यामध्ये सुधारणा केलली आहे याचा अभ्यास करण्यासाठी जनजाती सल्लागार परिषदेचे काही सदस्य, वित्त विभाग व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ पाठवावे. सदर शिष्टमंडळाच्या शिफारशीनुसार नवीन कायद्याचे प्रारुप तयार करण्यांत यावे. |
| १४ | अनुसूचित क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांना कृषि व फलोत्पादन, पशुसंवर्धन,मत्स्यव्यवसाय यामधील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रगती करण्यासाठी सदर क्षेत्रासाठी आदिवासी घटक कार्यक्रमाच्या १० टक्के निधी उपलब्ध करुन देणेबाबत. | आदिवासी विकास | आदिवासी उपयोजनेतंर्गत कृषी व कृषी संलग्न बाबीसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात १२.९२ टक्के तरतुद करण्यात आली असल्याचे परिषदेच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यावर परिषदेने समाधान व्यक्त करुन वन हक्क कायद्यांतर्गत मंजुर वैयक्तिक लाभार्थ्याच्या जमीनीच्या विकासासाठी प्राधान्याने तरतुद करण्याबाबत निर्देश दिले. |
| १५ | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या धर्तीवर आदिवासी उपयोजनेतर्गत निधी खर्च करण्यास २ आर्थिक वर्षाचा कालावधी देण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे. | वित्त | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या धर्तीवर आदिवासी उप योजनेतंर्गत निधी खर्च करण्यास दोन आर्थिक वर्षांचा कालावधी देण्यास जनजाती परिषदेने सकारात्मकता दर्शविली. याबाबत वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यांत यावा. |
| १६ | राज्यातील आदिवासीची स्पेशल जनगणना करुन लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण व निधीची तरतूद करणे. कारण नव्याने लोकसंख्येत वाढ झाली. परंतु आर्थिक वर्षात (बजेट) मध्ये निधीची तरतूद होत नाही करीता नव्याने तरतूद करावी | आदिवासी विकास | याविषयी परिषदेचे मा.सदस्य यांनी राज्यातील आदिवासी लोंकसंख्येची वाढ होऊन त्याचे प्रमाण १०.३४ टक्के एवढे झाले असल्याने त्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेस नियतव्यय उपलब्ध करण्याबाबत मागणी केली. त्यावर सन २०११ च्या जनगणनेनुसार ९.४ टक्के निधी देण्यात येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले, तसेच सदर बाब तपासून घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. |
| १७ | आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तर व राज्यस्तरावरील नियतव्ययाचे प्रमाणात सुधारणा करणे. | आदिवासी विकास | आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून जिल्हा स्तर व राज्य स्तर करीता सुधारीत नियतव्यय वाटप प्रमाण निश्चित करण्याबाबतच्या दि.२५/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीस परिषदेने मान्यता दिली. |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | आस्थापना विषयक खर्चाचा समावेश असलेल्या बाबींचा (वेतन व भत्ते) अनिवार्य खर्चात समावेश करणेबाबत. | वित्त | आस्थापनाविषयक खर्चाचा समावेश असलेल्या बाबींचा (वेतन व भत्ते) अनिवार्य खर्चात समावेश करण्याच्या प्रस्तावासंदर्भात विभागाने वित्त विभागास प्रस्ताव सादर करावा व त्यावर वित्त विभागाने तपासून योग्य विचार करावा. |
| १९ | आदिवासी उप योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन, संनियंत्रण व उपयोगिता तपासणे याकरीता एकूण नियतव्ययाच्या कमाल ०.५% इतका नियतव्यय राखीव ठेवणेबाबत. | आदिवासी विकास | आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन, संनियंत्रण व उपयोगिता तपासणे याकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून एकुण नियतव्ययाच्या कमाल ०.५% इतका नियतव्यय राखीव ठेवण्याबाबतच्या दि.१७/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीस परिषदेने मान्यता दिली. |
| २० | आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक नियोजनकरीता स्वतंत्र नियोजन कक्ष स्थापन करणेबाबत. | आदिवासी विकास | आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक नियोजनकरीता स्वतंत्र नियोजन कक्ष स्थापन करण्याच्या प्रस्तावास परिषदेने मान्यता दिली. त्यानुसार सद्यस्थितीत कार्यरत पदे वगळता उर्वरित पदे निर्माण करुन कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| २१ | आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीकरीता अर्थ व लेखा कक्ष स्थापन करणेबाबत. | आदिवासी विकास व वित्त | आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीकरीता स्वतंत्र अर्थ व लेखा कक्ष स्थापन करण्याच्या प्रस्तावास परिषदेने मान्यता दिली.त्यानुसार सद्यस्थितीत कार्यरत पदे वगळता उर्वरित पदे निर्माण करुन अर्थ व लेखा कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| २२ | राज्यात एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. च्या आदिवासी विद्यार्थ्यांना दरवर्षी २५ कोटी एवढी तरतूद करावी. | आदिवासी विकास | यासंदर्भात विभागाने दिलेल्या माहितीची परिषदेने नोंद घेतली. तसेच, जे आदिवासी विद्यार्थी एम.पी.एस.सी. किंवा यु.पी.एस.सी.ची पूर्व परिक्षा उत्तीर्ण होतात त्यांना मुख्य परिक्षेचा अभ्यास करण्यासाठी नवी दिल्ली येथील नामांकित अकादमीमध्ये प्रवेशासाठी निधी उपलब्ध करुन देणे तसेच त्यांच्या प्रशिक्षणांचा कालावधी २ वर्षाचा करण्यात यावा. |
| २३ | आश्रमशाळांचे श्रेणीवाढ व तुकडीवाढ करणे. | आदिवासी विकास | नोंद घेतली. |
| २४ | आश्रमाशाळांच्या व्यवस्थापनामध्ये नामांकीत खाजगी/ स्वयंसेवी संस्था / फाऊंडेशन यांचा सहभाग घेणे. | आदिवासी विकास | आश्रमशाळाच्या व्यवस्थापनामध्ये नामांकित खाजगी/स्वंयसेवी संस्था/फाऊंडेशन यांचा सहभाग घेण्यास परिषदेने मान्यता दिली . शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी नामांकित खाजगी संस्थेकडून (उदा.ओरिसा येथे KISS ( कलिंगा इंस्टीट्युट ऑफ सोशल सायन्स ), |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | टिच फॉर इंडिया, अझिझ प्रेमजी व पिरामल फाऊंडेशन इ.) मदत घेऊन तसेच नेटवर्कीग द्वारे शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची कार्यवाही करावी. |
| २५ | मराठी माध्यमाच्या आश्रमशाळांचे इंग्रजी/सेमी इंग्रजीमध्ये रुपांतर करणे. | आदिवासी विकास | आश्रमशाळांचे आवश्यकतेप्रमाणे इंग्रजी/सेमी इंग्रजी मध्ये रुपांतरित करण्यास परिषदेने मान्यता दिली. इंग्रजी भाषेत प्रभुत्व असणारे शिक्षक ग्रामीण भागासाठी उपलब्ध होत नसल्यास राज्याचे बाहेरचे शिक्षक घेण्यात यावेत. तसेच यासंदर्भात बांधकाम कक्षाच्या धर्तीवर अतिरिक्त आयुक्तनिहाय एक स्वतंत्र शिक्षण कक्ष निर्माण करून वेगळा शिक्षण अधिकारी नियुक्त करण्याच्या दृष्टीने विभागाने विचार करावा. |
| २६ | आदिम जमातींसाठीच्या स्वतंत्र शासकीय आश्रमशाळा स्थापन करणे. | आदिवासी विकास | आदिम जमातीसाठी स्वंतत्र आश्रमशाळा सुरु करण्यास परिषदेने शिफारस केली. |
| २७ | विभागीय स्तरावर क्रिडा संकुलाचे बांधकाम करणे. | आदिवासी विकास | अपर आयुक्त निहाय क्रीडा प्रबोधनी सुरु करण्यास परिषदेने शिफारस केली. तसेच आदिवासी कलांना प्रोत्साहन देण्याकरीता सेंटर स्थापन करावे. |
| २८ | एकलव्य निवासी शाळांचे बळकटीकरण व विस्तारीकरण करणे | आदिवासी विकास | एकलव्य निवासी शाळामध्ये राज्यशासनाच्या निधीतून इयत्ता १ ली ते ५ वी चे वर्ग सुरु करण्यास व त्यासाठी आवश्यक कर्मचारी उपलब्ध करुन देण्यास परिषदेने शिफारस केली. |
| २९ | आदिवासी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यासाठी बेंच मार्क सर्व्हे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करणे. | आदिवासी विकास | आदिवासी कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यासाठी बेंच मार्क सर्व्हे करण्यास परिषदेने मान्यता दिली. |
| ३० | आदिवासी आणि आदिम जमातीच्या सर्वांगिण विकासासाठी धोरण निश्चित करणे. | आदिवासी विकास | आदिवासी आणि आदिम जमातीच्या सर्वांगिण विकासासाठी धोरण निश्चित करण्यास परिषदेने मान्यता दिली. |
| ३१ | आदिवासी विकास महामंडळाचे बळकटीकरण करुन त्याच्या संरचनेमध्ये सुधारणा करणे | आदिवासी विकास | तज्ञ सल्लागारांची नेमणूक करुन आदिवासी विकास महामंडळाच्या संरचनेमध्ये बदल करुन महामंडळाचे बळकटीकरण करण्याच्या प्रस्तावास परिषदेने मान्यता दिली. याबाबत यापूर्वीच्या पाईप व ऑईल इंजिन वाटप योजनेबाबत चर्चा होऊन सदर योजना डीबीटी (DBT) स्वरुपात लवकरात लवकर सुरु करुन आदिवासी शेतकऱ्यांना याचा लाभ देण्याबाबत निर्देश देण्यात आले. डीबीटी स्वरुपात मदत देताना ५० टक्के रक्कम वस्तुच्या खरेदीपूर्वी व ५० टक्के रक्कम वस्तू खरेदी केल्यानंतर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच सदर योजनेसाठी यापूर्वी खरेदी करण्यांत आलेले पाईप व ऑईल इंजिन यांचे पूर्वीच्या लाभार्थ्यांना वाटप करण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| ३२ | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे बळकटीकरण करुन आदिवासी युवकांमध्ये स्वयंरोजगार व उद्योजकता विकासासाठी नविन योजना सुरु करणे. | आदिवासी विकास | सन २०१४ पासून शबरी महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजना बंद असल्याची तसेच इतर महामंडळाचे कर्ज यापूर्वी माफ झालेले आहे, परंतु शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे कर्ज माफ न झाल्याची बाब सदस्यांनी उपस्थित केली. याबाबत आदिवासी विकास महामंडळाचे खावटी कर्ज माफ केले असल्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले. महामंडळाचे बळकटीकरण करुन आदिवासी युवकांमध्ये स्वयंरोजगार व उद्योजकता विकासासाठी नवीन योजना सुरु करण्यास परिषदेने मान्यता दिली. |
| ३३ | अनुसूचित जमातीच्या लोकांना दिल्या जाणाऱ्या खावटी कर्जांची थकबाकी माफ करुन सदर योजना पुन्हा सुरु करण्याबाबत | आदिवासी विकास | अनुसूचित जमातीच्या ११,२५,९०७ शेतकऱ्यांचे थकीत खावटी कर्ज व त्यावरील व्याज असे एकूण रु.३६१.१७ कोटी माफ केल्याबद्दल जनजाती सल्लागार परिषदेच्या सदस्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांचे आभार व्यक्त केले. खावटी कर्ज योजना पुनश्च सुरु करण्याबाबत चर्चा झाली नाही. |
| ३४ | आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रिक्तपदे भरण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत चर्चा करावी. | आदिवासी विकास व सामान्य प्रशासन | याबाबत सचिव (साविस) यांनी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशीचे परिषदेस सादरीकरण केले. समितीच्या शिफारशीनुसार ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या क्षेत्रामध्ये १०० टक्के, २५ ते ५० टक्के दरम्यान आदिवासी लोकसंख्या असलेल्या क्षेत्रामध्ये ५० टक्के व २५ टक्के पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या क्षेत्रामध्ये २५ टक्के पदे ही स्थानिक अनुसूचित जमातीमधील उमेदवारांमधून भरण्यात यावी. सदर प्रस्तावास परिषदेने मान्यता दिली व त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने पुढील आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. |
| ३५ | महाराष्ट्र शासनाच्या शासकीय व निमशासकीय सेवेत जे अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहेत. अशा व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र तपासणी करुन वैध व पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना आरक्षणाच्या | आदिवासी विकास व सामान्य प्रशासन | सचिव (साविस) यांनी यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञेय याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबतची वस्तुस्थिती परिषदेमध्ये सादर केली. सदर याचिकेवर निर्णय झाल्यानंतर |

| | | | |
|---|---|---|---|
| | कायदा व नियमास अधीन राहून पदोन्नती देण्याची कार्यवाही करणे. | | पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत कार्यवाही करण्यांत यावी. |
| ३६ | आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळा, वसतीगृह व प्रशासकीय कार्यालयात रोजंदारी (करार पध्दतीने) कर्मचारी वर्ग-३ वर्ग-४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना रिक्त जागी सामावून घेणे. | आदिवासी विकास | वर्ग ३ कर्मचा-यांना भरती प्रक्रियेव्दारे, अर्हता आधारे समाविष्ट करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून दि. १७/१८ फेब्रुवारी २०१९ रोजी परिक्षा घेण्यात येत असल्याचे परिषदेच्या निर्देशनास आणून देण्यात आले व परिषदेने त्याची नोंद घेतली. |
| ३७ | आदिवासी क्षेत्रातील कौशल्य विकास व उपजिविकेच्या साधकाबाबत चर्चा व्हावी. | आदिवासी विकास | नोंद घेतली |
| ३८ | नविन प्रवर्गाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करताना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) यांच्या शिफारशीने प्रस्ताव तयार करण्यात यावा. | आदिवासी विकास | प्रस्तावास जनजाती सल्लागार परिषदेने मान्यता दिली. |
| ३९ | मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका ४०३२/२००९ व इतर समाविष्ट रिट याचिका मध्ये दि.१४ ऑगस्ट, २०१८ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणे व त्यासाठी स्वतंत्र ज्येष्ठ वकील/स्पेशल कॉन्सिल नियुक्त करणे. | आदिवासी विकास व विधी व न्याय | सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करावयाच्या विशेष अनुज्ञा याचिकेसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात यावी. आवश्यकतेनुसार स्वतंत्र ज्येष्ठ वकील/स्पेशल कॉन्सिल नियुक्त करण्यांत यावे. |
| ४० | मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल सिव्हिल अपील नं.८९२८/२०१५ मध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निकालाप्रमाणे जातीचे बोगस दाखले धारण केलेल्या गैरआदिवासी विरुध्द कारवाई करणे व सदर निकालाप्रमाणे अनुसूचित जमातींच्या (आदिवासी) रिक्त होणाऱ्या जागांवर विशेष मोहिमेव्दारे भरती करणे. | आदिवासी विकास व सामान्य प्रशासन | मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यांत आली आहे. मा.उच्च न्यायालयात सुध्दा राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत सदर अनुसूचित जमातीची पदे भरण्यात येतील, असे आश्वासित केले आहे. |
| ४१ | जात पडताळणी समितीच्या विरोधात उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रत्येक निकालाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपील (SLP) दाखल करणे. मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी विशेष मोहिम आखून कालबध्द कार्यक्रम आखून खऱ्या आदिवासींची बाजू मा.सर्वोच्च | आदिवासी विकास व विधी व न्याय | दक्षता पथकांवर ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबत तसेच दक्षता पथकामधील रिक्त पदे त्वरीत भरण्याच्या दृष्टीने गृह विभागाने तात्काळ कार्यवाही करावी असे निर्देश दिले. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याचे प्रत्येक प्रकरण हे गुणवत्तेवर तपासणी |

| | | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयात [illegible] भक्कमपणे मांडण्यासाठी विशेष ज्येष्ठ वकील (स्पेशल कॉन्सिल) नेमणे. | | करुन दाखल करण्यात येते. परंतु महत्वाच्या प्रकरणामध्ये अपील दाखल करण्यात कोणतीही अडचण येऊ नये. तसेच आवश्यक तेथे विशेष ज्येष्ठ वकील नेमता येईल. |
| ४२ | रक्त संबंधातील नातेवाईकांकडील जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय आदिवासी विकास विभाग लागू न करणे. | आदिवासी विकास | रक्त संबंधातील नातेवाईकांकडील जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय आदिवासी विकास विभाग लागू न करण्याच्या प्रस्तावास जनजाती सल्लागार परिषदेने मान्यता दर्शविली. |
| ४३ | राज्यात जातवैधता प्रमाणपत्र देण्यात येणारा जो कागद असतो तो सी.व्ही.सी. (जात वैधता प्रमाणपत्र) मध्ये १०० रुपयाचा मुद्रांकाचा पेपर वापरुन बारकोड सिस्टिम सी.व्ही.सी. (जात वैधता प्रमाणपत्र) देण्यात यावी. | आदिवासी विकास | सद्य:स्थितीत निर्गमित करण्यात येणाऱ्या जात वैधता प्रमाणपत्रावर अर्जदाराचा फोटो व बारकोड वापरण्यात येतो याची परिषदेस आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी माहिती दिली. परिषदेने याची नोंद घेतली. |
| ४४ | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामकाजात सुधारणा करणे व त्यांचे बळकटीकरण करणे. | आदिवासी विकास | अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामकाजात सुधारणा करण्याच्या व त्यांचे बळकटीकरण करण्याच्या प्रस्तावास परिषदेने मान्यता दिली तसेच, विद्यार्थांना ९लीच्या वर्गापासूनच जात वैधता देण्याबाबत विचार व्हावा असे परिषदेने सूचित केले |
| ४५ | आदिवासी (अनुसूचित जमाती) विक्री करण्यास पूर्णपणे प्रतिबंध करणे. | आदिवासी विकास व महसूल | आदिवासींच्या जमिनीची विक्री करण्यास परवानगी देण्याच्या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी मा.डॉ.विजय कुमार गावित, विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली जनजाती सल्लागार परिषदेची एक उप समिती गठीत करण्यात यावी. या समितीने याबाबत अभ्यास करून आपल्या अहवाल सादर करावा. |
| ४६ | महाराष्ट्रातील ज्या प्रदेशात (जिल्हयात) ९०% किंवा जास्त संख्येने राहतात, त्या प्रदेशात शेडयुल ६ (सहा) लागू करुन त्यांना स्वायत्त प्रदेशाचा दर्जा द्यावा, त्यासाठी ही सभा ठराव करुन केंद्र शासनास शिफारस करेल. | | आदिवासी प्रदेशाला शेड्युल सहा लागू करुन त्यांना स्वायत्त प्रदेशाचा दर्जा देण्यासाठीची बाब जनजाती सल्लागार परिषदेच्या अधिकार कक्षातील नसून त्यासाठी संसदेने संविधानात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यासाठी केंद्रशासनासोबत पत्रव्यवहार करावा. |
| ४७ | बऱ्याच अतिदुर्गम आदिवासी भागात टेलिफोन आणि मोबाईल संपर्क यंत्रणा उपलब्ध नाही. आदिवासी सल्लागार परिषेदेने सर्व आदिवासी पाडयांमध्ये निश्चित कालमर्यादेत, यासाठीच्या पुरेश्या निधीसह, | आदिवासी विकास व माहिती व तंत्रज्ञान | फायबर नेटवर्क सर्व ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. परंतु अतिदुर्गम आदिवासी भागात टेलिफोन आणि मोबाईल संपर्क यंत्रणा स्थापित करण्यासाठी आदिवासी भागामध्ये बीएसएनलच्या माध्यमातून मोबाईल टॉवर स्थापित करावेत व Reverse Auction |

| | | | |
|---|---|---|---|
| | मोबाईल संपर्क यंत्रणा स्थापित होईल याबाबतच्या उपाययोजनेबद्दल चर्चा करावी. | | पध्दतीने कमीत कमी दरात घेणाऱ्या कंपनीला काम देण्याचे निर्देश देण्यात आले आहे. |
| ४८ | अनुसूचित जमातीच्या कार्यक्षेत्रात पाणी साठयाच्या पा.त. लघु-पाटबंधारे यासारख्या योजना घेताना वन जमिन व अनुदान हे दोन अडथळे तात्काळ सोडवावेत. | आदिवासी विकास व महसूल व वन | सदर प्रकरणी वन विभागाने लक्ष घालून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ४९ | महाराष्ट्रामध्ये आदिवासी समाजाकडून चालविले जात असलेले सहकार तत्वावरील प्रकल्प फारच अत्यल्प प्रमाणात आहेत. सध्याच्या वस्त्रोद्योग धोरणानुसार १० टक्के सभासद भागभांडवल, ३० टक्के शासकीय भागभांडवल व ६० टक्के कर्ज या स्वरुपात सहकारी प्रकल्पांना मदत करण्यात येत आहे. परंतु आदिवासी सहकारी संस्थाना बँकांमार्फत कर्ज उभा करण्यास बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागून प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत. यास्तव नवीन धोरणानुसारचे ६० टक्के कर्जही आदिवासी विकास विभागाकडून देण्यात यावे. तसेच प्रत्येक वर्षी सहकारी तत्वावरील प्रकल्पांसाठी ठराविक निधी राखून ठेवण्यात यावा. | आदिवासी विकास | अशा प्रकारची योजना समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असल्याची बाब सदस्यांनी परिषदेच्या निदर्शनास आणली. आदिवासी विकास विभागाने यासंदर्भात समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती घेऊन त्या धर्तीवर आदिवासींसाठी योजना राबविण्याबाबत विचार करावा. |
| ५० | राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या धर्तीवर राज्यातही अनुसूचित जमाती आयोगाची निर्मिती करण्यांत यावी. | | चर्चा झाली नाही |
| ५१ | शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मासिक अनुदानातील फरक लक्षात घेता अनुदानित आदिवासी आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना ९६० रुपये ऐवजी ३००० रुपये प्रति विद्यार्थी करण्यांत यावे. | | सदर विषयावर सामाजिक न्याय विभागाकडून मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे मा.मुख्य सचिव यांनी परिषदेस अवगत केले. |
| ५२ | शासकीय आदिवासीच्या मुला-मुलीचे वसतिगृहात जिल्हा विभाग, तालुका व सर्व ठिकाणी लागू केलेली डीबीटी योजना रद्द करुन शासकीय भोजन (मेस) पूर्ववत सुरु करण्यांत यावी. | | या योजनेमुळे विद्यार्थ्यांना स्वत:च्या इच्छा व आवडीनुसार जेवण विविध मेस मधून मागविता येते. तसेच त्यातून त्यांच्या पैशाची बचत होऊन पुस्तके व इतर साहित्यासाठी त्यांना पैसे वापरता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या योजनेचे स्वागतच केलेले आहे. तरीपण या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | योजनेचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात येत असल्याचे प्रधान सचिव, आदिवासी विकास यांनी सांगितले. वसतीगृहामध्ये भोजनासाठी डीबीटी सुरु केल्यामुळे विद्यार्थ्यांकडून सदर निधीचा गैरवापर करण्यात येत असल्याचे मा.सदस्यांनी नमूद केले. त्यावर सदर योजनेची पुर्नतपासणी करण्यांत यावी. |

उपरोक्त विषयसूची शिवाय जनजाती सल्लागार परिषदेमध्ये खालील मुद्दे मा.सदस्यांनी उपस्थित केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद विभागामध्ये बोगस प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी स्थापन विशेष तपासणी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून त्यावर कार्यवाही करावी. | आदिवासी विकास | नोंद घेतली. |
| २ | धनगर ही वेगळी जात असल्याने त्यांचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यांत येऊ नये. | आदिवासी विकास | नोंद घेतली. |
| ३ | मन्नेरवारलू या जमातीचा अनुसुचित जमातीतून वगळण्याचा प्रस्ताव शासनास सादर झालेला आहे. त्यावर कार्यवाही करावी. | आदिवासी विकास | नोंद घेतली. |
| ४ | व्यावसायिक अभ्यासक्रमाची टयुशन फीस देण्यात येत आहे. त्याबरोबरच इतर शुल्क सुध्दा विद्यार्थ्यांना देण्यात यावे. | आदिवासी विकास | शुल्क नियमन प्राधिकरणांकडून याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. तरी सदर बाब तपासण्यात यावी. |

शेवटी मा. मुख्य सचिव यांनी मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष यांचे तसेच अन्य उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झाल्याचे मा. अध्यक्षांच्या वतीने घोषित केले.

**************

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ फेब्रुवारी,२०१९ रोजी मंत्रिमंडळ सभागृह, सहयाद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य जनजाती परिषदेच्या ५० व्या बैठकीस उपस्थित सदस्यांची सूची.

| अ.क्र. | सन्माननीय सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| | सन्माननीय सदस्य | |
| १ | मा. डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत | विधानसभा सदस्य |
| २ | मा. श्री. प्रभुदास बाबुराव भिलावेकर | विधानसभा सदस्य |
| ३ | मा. श्री. संजय हनुवंतराव पुराम | विधानसभा सदस्य |
| ४ | मा. श्री. कृष्णा धनाजी गजबे | विधानसभा सदस्य |
| ५ | मा.डॉ. देवराव मादगुजी होळी | विधानसभा सदस्य |
| ६ | मा.श्री. अशोक रामाजी उईके | विधानसभा सदस्य |
| ७ | मा. श्री. राजू नारायण तोडसाम | विधानसभा सदस्य |
| ८ | मा. श्री. पास्कल जान्या धनारे | विधानसभा सदस्य |
| ९ | मा.श्री. शांताराम तुकाराम मोरे | विधानसभा सदस्य |
| १० | मा. श्रीमती निर्मला रमेश गावीत | विधानसभा सदस्य |
| ११ | मा.श्री. नरहरी सिताराम झिरवाळ | विधानसभा सदस्य |
| १२ | मा.श्री. अमित कृष्णा घोडा | विधानसभा सदस्य |
| १३ | मा.डॉ. आर.के. मुटातकर | राज्यपाल नियुक्त सदस्य |
| १४ | मा.श्री. मिलिंद थत्ते | राज्यपाल नियुक्त सदस्य |
| १५ | मा.श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव (आ.वि.) | सदस्य सचिव |
| | कायम निमंत्रित सदस्य | |
| १६ | मा.श्री.हरिश्चंद्र देवराम चव्हाण | संसद सदस्य |
| १७ | मा. श्री. अशोक महादेवराव नेते | संसद सदस्य |
| १८ | मा. डॉ. हिना विजयकुमार गावीत | संसद सदस्य |
| १९ | मा.श्री.राजेंद्र गावीत | संसद सदस्य |
| २० | मा.श्री. जीवा पांडू गावीत | विधानसभा सदस्य |
| २१ | मा.ॲड. के.सी.पाडवी | विधानसभा सदस्य |
| २२ | मा.श्री. धनाजी सिताराम अहिरे | विधानसभा सदस्य |
| २३ | मा.श्रीमती दिपिका संजय चव्हाण | विधानसभा सदस्य |
| २४ | मा. श्री. पांडुरंग महादू बरोरा | विधानसभा सदस्य |
| २५ | मा. श्री. वैभव मधुकर पिचड | विधानसभा सदस्य |
| २६ | मा. श्री. संतोष टारफे | विधानसभा सदस्य |

**************

## मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ फेब्रुवारी,२०१९ रोजी मंत्रिमंडळ सभागृह, सहयाद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य जनजाती परिषदेच्या ५० व्या बैठकीस उपस्थित अधिका-यांची सूची

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री. यू.पी. एस. मदान | अपर मुख्य सचिव | वित्त विभाग |
| २ | श्रीमती मेधा गाडगीळ | अपर मुख्य सचिव | महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन) |
| ३ | श्री. सिताराम कुंटे | अपर मुख्य सचिव | सामान्य प्रशासन विभाग |
| ४ | श्री. प्रविण परदेशी | अपर मुख्य सचिव | मुख्यमंत्र्यांचे सचिवालय |
| ५ | श्री. सतिष गवई | अपर मुख्य सचिव | उद्योग विभाग |
| ६ | श्री. शामलाल गोयल | अपर मुख्य सचिव | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग |
| ७ | श्री. देबाशिष चक्रवर्ती | अपर मुख्य सचिव | नियोजन विभाग |
| ८ | श्री. मनु कमार श्रीवास्तव | अपर मुख्य सचिव | महसूल व वन विभाग (महसूल व मुद्रांक) |
| ९ | श्री. बिपिन मल्लिक | अपर मुख्य सचिव | सामान्य प्रशासन विभाग |
| १० | श्रीमती आभा शुक्ला | प्रधान सचिव | सहकार विभाग |
| ११ | श्री. असीमकुमार गुप्ता | प्रधान सचिव | ग्रामविकास विभाग |
| १२ | श्री. विकास खारगे | प्रधान सचिव | महसूल व वन विभाग (वने) |
| १३ | श्री. आर.एन. लड्ढा | प्रधान सचिव | विधी व न्याय विभाग |
| १४ | श्री. अनुपकुमार | प्रधान सचिव | पदुम व पणन विभाग |
| १५ | श्री. राजेंद्र भागवत | सचिव | संसदीय कार्य विभाग |
| १६ | श्री. एकनाथ डवले | सचिव | मृद व जलसंधारण विभाग |
| १७ | श्री. शिवाजी रघुनाथ दौंड | सचिव | सामाजिक विकास समन्वय विभाग |
| १८ | श्री. चंद्रशेखर पी. जोशी | सचिव | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| १९ | श्री. सुनिल पाटील | सह सचिव | आदिवासी विकास विभाग |
| २० | श्री. लक्ष्मीनारायण मिश्रा | आयुक्त | पशुसंवर्धन विभाग |
| २१ | श्रीमती इंद्रा मालो | आयुक्त | महिला व बालकल्याण विभाग |
| २२ | डॉ. तात्याराव लहाने | संचालक | वैद्यकीय शिक्षण |
| २३ | डॉ. किरण कुलकर्णी | आयुक्त | आदिवासी विकास |
| २४ | श्री. प्रदीप चंद्रन | अपर आयुक्त | अमरावती |
| २५ | श्रीमती चारुशीला तांबेकर | सह सचिव | अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| २६ | श्री. दिनेश डिंगळे | सह सचिव | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| २७ | श्री. सतिष जोंधळे | सह सचिव | राजशिष्टाचार |
| २८ | श्री. महेश देवरे | खाजगी सचिव | मा.मंत्री, आदिवासी विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | श्री. ओमप्रकाश पाटील | विशेष कार्य अधिकारी | मा. मंत्री, आदिवासी विकास |
| ३० | श्री. सु.ना.शिंदे | उप सचिव | आदिवासी विकास विभाग |
| ३१ | श्री. ल.गो. ढोके | उप सचिव | आदिवासी विकास विभाग |
| ३२ | श्री. सं.रा. तिरमनावर | उप सचिव | जलसंधारण विभाग |
| ३३ | श्री. सूर्यकांत कि. निकम | उप सचिव | पर्यावरण विभाग |
| ३४ | श्री. दिलीप देशमुख | उप सचिव | सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) |
| ३५ | श्री.एस.टी. जाधव | उप सचिव८ | नगरविकास विभाग |
| ३६ | श्री.सु.ल.टोपले | उप सचिव | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ३७ | श्री.गिरीश सरोदे | व्यवस्थापकीय संचालक | आदिवासी विकास महामंडळ |
| ३८ | श्री.सि.ता.भालेकर | सह आयुक्त | जात पडताळणी समिती, ठाणे |
| ३९ | श्री. एम. ए. शेख | उप आयुक्त | अपर आयुक्त, ठाणे |
| ४० | श्री. द.ह. कदम | अ.स. | गृह विभाग(परिवहन) |
| ४१ | श्री. रविंद्र औटे | अवर सचिव | आदिवासी विकास विभाग |
| ४२ | श्री. रविंद्र जाधव | अवर सचिव | आदिवासी विकास विभाग |
| ४३ | श्री.रविंद्र भोसले | कक्ष अधिकारी | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग |
| ४४ | श्रीमती नेहा हुमरासकर | कक्ष अधिकारी | शालेय शिक्षण विभाग |
| ४५ | श्री. बाळासाहेब सावंत | कक्ष अधिकारी | पर्यटन व सांस्कृतिक विभाग |
| ४६ | श्री. हेमंत वाडीकर | कक्ष अधिकारी | अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| ४७ | श्री. पांडुरंग राऊत | कक्ष अधिकारी | आदिवासी विकास विभाग |
| ४८ | श्री. योगेश सावंत | कक्ष अधिकारी | आदिवासी विकास विभाग |
| ४९ | श्री. ललितकुमार धायगुडे | कक्ष अधिकारी | आदिवासी विकास विभाग |

**************